
# क्षेत्रीय अभ्यास (Field Work)




डॉ. प्रफुल्ल ठाकरे (भूगोल विभाग )

# प्रस्तावना

आधुनिक जगत ***संशोधंनाला*** खूप महत्व आहे. त्या दृष्टीकोणातून भौगोलिक संशोधनाचा विचार केला तर भूगोल हा ***वैज्ञानिक शास्त्रे*** (Natural Science) व ***सामाजिक शास्त्रे*** (Social Science) यांच्या सीमारेषेवर आहे. त्यामुळे भौगोलिक संशोधनात ***क्षेत्रीय अभ्यासला*** फार महत्व आहे. मानवाचा विकास आणि देशाचा आर्थिक विकास हा ***भौगोलिक घटकांवर*** अवलंबून आहे. भौगोलिक घटकांच्या अभ्यासासाठी त्या-त्या प्रदेशात जाऊन तेथील ***मानवी जीवन व नैसर्गिक पर्यावरणाच्या सहसंबंधांचा अभ्यास*** करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे भूगोलाचे विद्यार्थी व प्राध्यापक यांना काही क्षेत्रात जाऊन प्रत्यक्ष क्षेत्रीय अभ्यास करावा लागतो व त्या आधारे भूगोलशास्त्रातील उदाहरणे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकच्या सहाय्याने प्रत्यक्षात तपासून पहिले जातात. त्या आधारावर क्षेत्रीय अभ्यासाची उपयुक्तता ठरवली जाते.



# क्षेत्र (Field) म्हणजे काय ?

" संशोधांनासाठी अथवा अभ्यासासाठी निवडलेला विशिष्ट भूप्रदेश किंवा स्थान अथवा ठिकाण म्हणजे क्षेत्र होय."



# क्षेत्रीय अभ्यास (Field Work) म्हणजे काय ?

" एखाद्या क्षेत्राला प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण व मुलाखतीच्या सहाय्याने भौगोलिक पाहणीद्वारे  नैसर्गिक व संस्कृतिक घटकांच्या अभ्यासला क्षेत्रीय अभ्यास म्हणतात."







- भूगोल हे निरीक्षणाद्वारे शिकण्याचे शास्त्र आहे. संपूर्ण पृथ्वीचा अभ्यास निरीक्षणाने शक्य नसला तरी आपल्या परिसरातील काही भौगोलिक घटकांचा अभ्यास प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन आपल्याला करता येतो.
- प्रत्यक्ष निरीक्षणाने विद्यार्थ्यांना आपण आपल्या सभवतालच्या परिसरात जे पाहतो त्यात भौगोलिक तत्वे कशी उमटतात याचा प्रत्यक्ष अभ्यास सहली च्या माध्यमातून विद्यार्थी करीत असतात. म्हणूनच विद्यार्थ्यात भौगोलिक दृष्टीकोण विकसित करण्यासाठी माध्यमिक शाळे पासून महाविद्यालया पर्यन्त अभ्यासक्रमात अशा अभ्यासाला महत्व दिले आहे.
- क्षेत्रीय अभ्यासात एखादे वैषिठ्यपूर्ण किंवा लहान क्षेत्र निवडून त्याचे संस्कृतिक व नैसर्गिक घटक लक्षात घेऊन त्यांचा मानवी क्रियांवर कसा परिणाम होतो याचा अभ्यास करावा लागतो. नैसर्गिक घटकांत भुपृष्ठरचना, जमीन, हवामान, वनस्पती, जलप्रणाली व प्राणी, यांचा समावेश होतो तर संस्कृतिक घटकात शेती, वस्ती, दळणवळण, कारखाने, जलसिंचन, लोक-जीवन इत्यादि चा समावेश होतो.

# क्षेत्र अभ्यासाची भौगोलिक संशोधांनातील भूमिका

1.क्षेत्र अभ्यास विद्यार्थ्यांना भौगोलिक घटकांच्या गटांमधील संबंध समजून घेण्यास सक्षम करते.

2.विद्यार्थ्यांचा संज्ञानात्मक विकास करण्यासाठी शिक्षण आणि योगदान देण्याचे एक साधन प्रदान करते.

3.वर्ग आणि वास्तविक जग यामधील फरक कमी करण्यात मदत करण्यासाठी विद्यार्थ्यांना भौगोलिक संज्ञा आणि प्रक्रिया समजून घेण्यास मदत करते.

4.क्षेत्र अभ्यासामुळे विद्यार्थ्यांना "वास्तविक" संशोधन करण्याची संधी प्राप्त होते.

5.विविध कौशल्यांच्या विस्तृत विकासास प्रोत्साहन मिळते, यात निरीक्षक कौशल्ये, माहितीचे संकलन आणि विश्लेषण, मॅपिंग कौशल्यांचा समावेश होतो.

# क्षेत्र अभ्यासाचे महत्त्व

1.भूगोलात क्षेत्रीय अध्यायनाला खूप शैक्षणिक महत्त्व आहे कारण यामुळे विद्यार्थ्यांना एखाद्या विशिष्ट प्रदेशाचा भौगोलिक अनुभव येऊ शकतो जो सैद्धांतिक ग्रंथ करू शकत नाही.

2.क्षेत्रीय सर्वेक्षण नमुने आणि स्थानिक वितरण, त्यांची संघटना आणि स्थानिक पातळीवरील संबंधांबद्दलची आपली समज वाढवते.

3.क्षेत्रीय सर्वेक्षण स्थानिक स्तरावरील माहितीचे संग्रहण (Data Collection) सुलभ होते जे दुय्यम स्त्रोतांद्वारे उपलब्ध नाहीत.

4.क्षेत्रीय सर्वेक्षण अभ्यासकांना परिस्थिती आणि प्रक्रिया संपूर्णपणे आणि त्यांच्या घटनेच्या ठिकाणी समजून घेण्यास सक्षम करतात.

5.सर्व भौगोलिक कौशल्ये क्षेत्रीय कार्यादरम्यान व्यावहारिकपणे वापरली जातात.

6. आपल्याला सॅम्पलिंग, डेटा संग्रहण, डेटा प्रक्रिया करणे, प्रश्नावली बनविणे, नकाशा तयार करणे, निकाल मिळविण्यासाठी सांख्यिकीय तंत्र, निरीक्षक कौशल्ये आणि मुलाखत घेण्याची कौशल्ये इत्यादी कौशल्ये शिकण्याची आणि त्यांची अंमलबजावणी करण्यास मदत मिळेल.
7. यामुळे आपल्याला सैद्धांतिक संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत होते.
8. अभ्यास क्षेत्रातील लोकांबद्दल समज आणि संवेदनशीलता विकसित करते.ज्यामुळे पूर्वग्रह नष्ट होतात.
9. सर्वात महत्वाचे म्हणजे ते आनंददायक आहे आणि आपल्याला एक उत्कृष्ट संस्मणीय अनुभव देते.

# क्षेत्र अभ्यासाची पूर्वतयारी (Preparation of Field work)

भौगोलिक पाहणीस जाण्यापूर्वी आपण कोणत्या उद्देशाने तेथे जात आहोत हे आपणास माहीत असणे आवश्यक आहे. हे उद्दीष्ट्य साध्य करताना त्या परिसरात कोण कोणती भौगोलिक वैशिष्ट्ये आपणास दिसणार आहेत याचा विचार करावा. त्या प्रदेशचा कच्चा आराखडा तयार करावा. त्यामुळे आपण निवडलेल्या परिसरात जाण्यासाठि रास्ता कोणता आहे, वाहतुकीचे साधन, लागणारा वेळ याची पूर्वकल्पना येते.



# *क्षेत्र अभ्यासासाठी लागणारे साहित्य (Equipment's)*

1. अभ्यास क्षेत्राचा नकाशा (Map)
2. क्षेत्र पुस्तिका (Field Book)
3. पेन
4. पेन्सिल
5. मोजपट्टी व टेप
6. दूरदर्शक यंत्र (Binocular)
7. होकायंत्र (Compass) व GPS



8. निसर्गातील अथवा अभ्यास क्षेत्रातील वैशिठ्यपुर्ण भूरूपांची व संस्कृतिक भूदृश्यांची छायाचित्र घेण्यासाठी कॅमेरा.
9. मुलाखतीच्या प्रश्नावल्या

निरीक्षण द्वारे व मुलाखती द्वारे प्रश्न नमून्यातिल प्रश्नांची उत्तरे नीट लिहायची असतात. यासाठी प्रश्नावलीतील प्रश्नांचा अर्थ व उद्देश आधीच समजून घ्यावा. निवडलेल्या अभ्यास प्रदेशातील भौगोलिक घटकांची नोंद काळजीपूर्वक आणि जगरूकपणे घ्यावी.